ePaper

राज ठाकरे मैदानात, नागपुरातून महाविकास आघाडीला धक्का देण्याची तयारी




वर्ष - 6 । अंक - 146 | UDYAM-MH-26-0158827

महाईन्यूज™

लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

बाप्पा मोरया...

www.mahaenews.com | ।रविवार ।दिनांक 4 सप्टेंबर 2022 | पिंपरी-चिंचवड आवृत्ती | mahaenews.com | maha_enews | Mahaenews

# हक्काच घर हवे, सर्वेक्षणमध्ये सहभागी व्हा!

## झोपडीमुक्त शहरांसाठी सर्व्हेक्षणाशिवाय पर्याय नाही!

### ⏭। मुख्य कार्यकारी अधिकारी राजेंद्र निंबाळकर यांची भूमिका


### ⏭। बोगस झोपडीधारकांचा मात्र कायदेशीर सर्व्हेक्षणाला विरोध

**पिंपरी-चिंचवड।**
**।महाईन्यूज ।प्रतिनिधी।**

**पिंपरी-चिंचवड झोपडपट्टीमुक्त करण्याचा संकल्प प्रशासनाने केला आहे. मात्र, गेल्या अनेक वर्षापासून झोपड्यांचे प्रमाण वाढले असून, बेकायदा धंदे, गुन्हेगारी आणि बकालपणाचे चित्र दिसते. अशा परिस्थितीत शहरातील झोपडपट्टीचे सर्व्हेक्षण करणे आणि खऱ्या झोपडीधारकांना हक्काचे घर उपलब्ध करून देणे, याशिवाय पर्याय नाही. अन्यथा बेकायदेशीर झोपड्यांचे प्रमाण वाढणार असून, शहराचे सामाजिक स्वास्थ्य बिघडण्याची भिती आहे. झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाच्या पुढाकाराने पिंपरी-चिंचवडमधील झोपडपट्यांचे सर्व्हेक्षण हाती घेण्यात आले.**

या सर्व्हेक्षणामध्ये संबंधित झोपडीधारकाची माहिती घेऊन।घरांवर नंबर दिले जातात. त्याद्वारे पात्र लाभार्थ्यांना पूनर्वसन प्रकल्पामध्ये कायदेशीर हक्काचे घर दिले जाते. विशेष म्हणजे, झोपड्यांचे सर्व्हेक्षण २२ वर्षांपूर्वी झाले होते.

त्यानंतर सर्व्हेक्षण झालेले नाही. त्यामुळे सर्व्हे न झालेल्या झोपड्यांचे प्रमाण सर्वाधिक आहे. सर्व्हे केलाच नाही, तर या झोपडीधारकांना नवीन प्रकल्पात घर कसे मिळणार? हा कळीचा मुद्दा आहे. दरम्यान, झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाचे मुख्य कार्यकारी अधिकारी राजेंद्र निंबाळकर यांनी शहरातील झोपडपट्टी धारकांच्या हिताचे दृष्टीने सर्व्हेक्षणाचे काम हाती घेतले. त्यामुळे झोपडपट्टीधारकांना दिलासा मिळाला असून, हक्काचे घर मिळण्याचा मार्ग मोकळा झाला आहे.



### स्वार्थापोटी खऱ्या झोपडीधारकांचे नुकसान...

झोपडपट्टी मुक्त शहर आणि गोरगरिबांना हक्काचे घर मिळावे, हीच प्रशासनाची भूमिका आहे. मात्र, सर्व्हेक्षणाला विरोध करण्याची भूमिका काही नागरिकांकडून घेतली जात आहे. ज्याला कायदेशीर काहीही आधार नाही. काही व्यक्तींनी झोपड्यांमध्ये आठ-दहा जागा ताब्यात घेवून पक्क्या झोपड्या थाटल्या आहेत. झोपडीचा ताबा आहे, पण झोपडीत राहत नाहीत. काहीजणांनी झोपड्या भाडेतत्त्वावर दिल्या आहेत. त्यामुळे सर्व्हे केल्यानंतर आपला गोरखधंदा बंड पडेल, या चिंतेतून अन्य झोपडीधारकांना फूस लावण्याचा प्रकार केला जात आहे. सर्व्हेक्षण आणि पुनर्वसन प्रकल्पाबाबत प्रशासन जनजागृती करण्याचा प्रयत्न करीत आहे. पण, काही व्यक्तींना झोपड्या हटवण्यापेक्षा स्वतःचा स्वार्थ महत्त्वाचा वाटतो. त्यामुळे झोपडपट्टी पुनर्वसन प्रकल्पाला खोडा घालण्याचा प्रयत्न केला जात आहे.



“ भोसरीतील खंडेवस्ती येथे साडेचार एकरमध्ये सुमारे ७०० झोपड्या आहेत. त्यांचे पुनर्वसन नियमाप्रमाणे करण्याचा निर्णय प्रशासनाने घेतला आहे. ७५ टक्के लोकांनी संमती दर्शवली आहे. त्याआधारे प्राथमिक सर्व्हेक्षण करण्याचे सुरू केले आहे. त्याला काही लोकांनी विरोधाची भूमिका घेतली. हक्काचे घर आणि अन्य पायाभूत सुविधा देण्यात येणार आहेत. शासकीय कामात अडथळा निर्माण करणे हा पर्याय नाही. विरोधासाठी वरिष्ठ पातळीवर अपील करता येते. न्यायालयाचे दरवाजेही खुले आहेत. विरोधासाठी विरोध हे योग्य नाही. नियमानुसार आम्ही काम करीत आहोत. येत्या ५ सप्टेंबर रोजी सर्व्हेक्षण करणार आहोत. त्यावेळी होणाऱ्या मिटिंगमध्ये बाजू मांडण्याची सर्वांना संधी देण्यात येणार आहे.

**-राजेंद्र निंबाळकर,**
मुख्य कार्यकारी अधिकारी, झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण.

# भाजपचे मिशन बारामती!

## दिल्लीतून नियोजन : केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन तीन दिवसीय बारामती दौऱ्यावर

**इंदापूर । ।महाईन्यूज ।प्रतिनिधी।**

2024 लोकसभा निवडणुकीत बारामती मतदारसंघातून कोणत्याही परिस्थितीत भाजपचाच खासदार निवडून आण्यासाठी दिल्लीवरून नियोजन होत आहे. भाजपने ए फॉर अमेठी फत्ते केली. आता बी फॉर बारामती मिशन हाती घेतले आहे. असे प्रतिपादन बारामती लोकसभा मतदारसंघाचे भाजप प्रभारी आमदार प्रा. राम शिंदे यांनी केले. इंदापूर येथील अर्बन बँकेच्या सभागृहात बारामती लोकसभा मतदार संघ नियोजन तसेच केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांचा 22, 23 व 24 सप्टेंबर रोजी तर प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे 6 सप्टेंबर रोजी बारामती लोकसभा मतदार संघ दौऱ्या असणार आहेत.



### उद्धव ठाकरेंना शह देण्यासाठी शिंदे गटाचा नवा डाव; मुख्यमंत्री स्वत; घेणार पुढाकार

निर्मला सीतारामन या तीन दिवस बारामती मतदारसंघ दौऱ्यावर येणार आहेत. यामध्ये 23 सप्टेंबर रोजी त्या इंदापूरमध्ये मुक्कामी येणार असून 24 सप्टेंबर रोजी सकाळी इंदापूर शहरांमध्ये प्रतिष्ठित नागरिक, डॉक्टर, वकील, व्यापारी शिक्षक, यांच्यासह त्या बैठक घेणार आहेत. त्यानंतर दुसरी बैठक निमगाव केतकी येथील संत सावतामाळी कार्यालय या ठिकाणी शेतकरी मेळावा तर तीसरी बैठक भिगवण येथे महिला मेळावा घेण्यात येणार आहे. अशी माहिती माजी मंत्री हर्षवर्धन पाटील यांनी दिली.

### 'शिवसेनेचे मुंबई महापालिकेत 'मिशन 150'!'

या वेळी बोलताना शिंदे म्हणाले, 2019 ला कोणालाही वाटेल नव्हते अमेठीमध्ये राहुल गांधी पराभूत होतील. मात्र, भाजपने ते करून दाखवले. आता 2024 ला बी फॉर बारामतीचे मिशन हाती घेतले आहे. यासाठीच देशाच्या अर्थमंत्री 22, 23, व 24 सप्टेंबरला बारामती लोकसभा मतदारसंघ दौऱ्यावर येणार आहेत, अशी माहिती दिली. बारामती लोकसभा मतदारसंघ दौऱ्यावर येणाऱ्या निर्मला सीतारामन याचे इंदापूर मध्ये भव्य दिव्य स्वागत केले जाईल, तसेच त्यांच्या माध्यमातून केंद्रीय पातळीवरील प्रश्न सोडविण्यासाठी प्रयत्न केले जातील. असे आश्वासन शिंदे यांनी देले. या वेळी जिल्हाध्यक्ष गणेश भेगडे यांनी प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे व निर्मला सीतारामन यांच्या दौरा नियोजनाची माहिती दिली. यावेळी विलास वाघमोडे, शहरध्यक्ष शकील सय्यद, अ‍ॅड. कृष्णाजी यादव, अशोक इजगुडे, गोरख शिंदे, शेखर पाटील, सुनील अरगडे, हरिभाऊ जाधव, बाळासाहेब मोरे, माऊली चवरे, पिंटू काळे, माऊली वाघमोडे, गजानन वाकसे, यांचेसह अन्य मान्यवर उपस्थित होते. यावेळी तालुकाध्यक्ष शरद जामदार यांनी प्रास्ताविक तर आभार तानाजी थोरात यांनी मानले.

या पार्श्वभूमीवर आयोजित बैठकीत राम शिंदे बोलत होते.

यावेळी माजी मंत्री हर्षवर्धन पाटील, किसन मोर्चा प्रदेशाध्यक्ष वासुदेव काळे, जिल्हाध्यक्ष गणेश भेगडे, पृथ्वीराज जाचक, अविनाश मोटे, उदयसिंह पाटील, मयूरसिंह पाटील, मारुती वणवे, तेजस देवकाते यांच्यासह अन्य मान्यवर उपस्थित होते.


---

# एक्सर्बिया अबोडमध्ये आग! : आग लागल्यानंतर सगळ्यात आधी सुरक्षेची कोणती पावलं उचलायला हवीत?

## अग्नीरोधक प्रशिक्षक तथा फायर सेफ्टी ऑफिसर धनंजय वाणी यांचे मार्गदर्शन!

**वडगाव-मावळ । ।महाईन्यूज । गणेश क्षिरसागर।**

वडगाव मावळमधील जांभुळ येथील एक्झर्बिया अबोड सोसाटीमध्ये शुक्रवार 2 सप्टेंबर रोजी रात्री 8.30 च्या दरम्यान आग लागली. ही आग बघायला सोसायटीमधील रहिवाशांनी तोबा गर्दी केली. मात्र ही आग लागलेली असताना येथील रहिवाशी महिला, पुरुष मंडळी कुतूहलाने पाहत होते. मध्ये मध्ये टाळ्यांचादेखील कडकडाट ऐकायला, पहायला मिळत होता. तर काहीजण या आगीचे क्षण आपल्या मोबाईलमध्ये टिपण्यात व्यस्त होते. येथील सारा माहोल पाहता नागरीकांच्या चेहऱ्यावर जरा देखील भीती नव्हती अथवा चिंता दिसत नव्हती. जमलेल्या सर्व नागरीकांच्या चेहऱ्यावर फक्त आणि फक्त कुतूहल आणि कमालीचा उत्साह पहायला मिळत होता. थोड्या वेळाने ही आग विझवली. नंतर सर्वांनाच कळले की ही आग लागली नव्हती तर लागलेली आग आटोक्यात कशी आणायची. किवा समूळ कशी संपवावी याबाबत गणेशोत्सवानिमित्त अग्निरोधक प्रशिक्षक धनंजय वाणी यांचे मार्गदर्शन येथील रहिवाशांना देण्यात आले. अग्निरोधक प्रशिक्षक, फायर सेफ्टी ऑफिसर तथा एक्झर्बिया अबोड गणेश उत्सव मंडळाचे विद्यमान अध्यक्ष धनंजय वाणी यांनी सोसायटीमधील जमलेल्या रहिवाशांना अग्निविषयी सखोल मार्गदर्शन करताना सांगितले की, आग कधी, कुठे आणि कशी लागेल याबद्दल आपण काहीही सांगू शकत नाही. मात्र आग लागल्यानंतर ती आटोक्यात कशी आणता येईल किंवा ती लागण्याआधी आपण कोणती काळजी घेऊ शकतो. आग लागल्यानंतर सगळ्यात आधी सुरक्षेची कोणती पावलं उचलायला हवीत? याबाबत आपण सजग असणे अत्यंत आवश्यक आहे. या अनुषंगाने अग्नीरोधक प्रशिक्षक धनंजय वाणी यांनी प्रत्यक्षिकासह काही उपाय सूचविले. यावेळी सोसायटीमधील रहिवाशांसह एक्झर्बिया अबोड गणेशोत्सव मंडळाचे सर्व पदाधिकारी अध्यक्ष धनंजय वाणी, उपाध्यक्ष दीपक पाटील, खजिनदार पंढरीनाथ हिंगे, मार्गदर्शक सतिश कदम, प्रसन्न शिरोडकर, सचिन कासार, प्रकाश कांबळे, कार्यक्रमाचे प्रयोजक विशाल गोडसे, युवराज कदम, सल्लागार सचिन शिंदे, अमोल दिसले, सचिव दिनेश सकट, सहसचिव सत्यवान वाळुंज, कार्यवाहक गणेश क्षिरसागर, सचिन कुंभार, सुनील पवार, कृष्णा लोखंडे, चंद्रशेखर शर्मा, सुमीत पुरी, सागर माळकर, नीलेश परदेशी, बाळासाहेब लभडे, सोहेल शेख, रविंद्र उतेकर, पुंजाजी ससाणे, शरद सातपुते, रविंद्र जाधव, राजेश सोळंकी, पियुष पाटील, अजित गोळराखे, माध्यम प्रतिनिधी सार्थक कुंभार, ओम हिंगे, सुधांशु अनेच्छा, आदित्य कदम यांची प्रामुख्याने उपस्थिती लाभली.



### ठोस उपाययोजनांची आवश्यकता :

आग लागू नये यासाठी काही प्रतिबंधात्मक उपाय आणि त्या पद्धतीचे कायदे करण्याची आपल्याकडे फार आवश्यकता आहे. त्यातून आपण अनेक घटना रोखू शकतो. कारण अनेकदा आगीच्या ठिकाणी मालमत्तेचे नुकसान तर होतेच त्याशिवाय अनेकदा मृत्युमुखी पडणाऱ्यांची संख्या सुद्धा फार मोठी असते. त्यामुळे या घटनांकडे गांभीर्याने बघण्याची आवश्यकता आहे आणि त्या पद्धतीने उपाययोजना करणे आवश्यक आहे. असे अनमोल मार्गदर्शन वाणी यांनी येथील रहिवाशांना केले.



"मला एक्झर्बिया अबोड सोसायटीमध्ये फायरचे मार्गदर्शन करण्याची संधी दिली. त्याबद्दल एक्झर्बिया अबोड गणेशोत्सव मंडळाचा आणि सोबतच सर्व रहिवाशांनी आपला अनमोल वेळ दिला. माझे मार्गदर्शन समजून घेतले त्याबद्दल मी सर्वांचे मनःपूर्वक आभार मानतो. आग आटोक्यात आणण्यासाठी आणीबाणी च्या वेळेस आपल्याला कोणती मदत घ्यायची. आणि महिला स्वयंपाक करताना त्यांनी घ्यावयाची काळजी या बद्दल मला मार्गदर्शन करण्याची संधी मिळाली. खरे तर ही काळाची गरज आहे. त्याची माहिती हि सर्वांना असायला हवी. आग लागल्यास आपण घाबरून न जाता त्याच्या वर लवकरात लवकर मात करता आली पाहिजे. अपघात किंवा आपत्कालीन परिस्थितीच्या वेळी पोलिस, रुग्णवाहिका किंवा अग्निशमन दल यांची मदत घेतांना वेगवेगळ्या क्रमांकावर संपर्क करावा लागतो. पोलिसांसाठी 100, रुग्णवाहिकेसाठी 102 तर अग्निशमन सेवेसाठी 101 असे नंबर आहेत.

- **धनंजय वाणी,** अग्निरोधक प्रशिक्षक, फायर सेफ्टी ऑफिसर तथा एक्झर्बिया अबोड गणेश उत्सव मंडळाचे विद्यमान अध्यक्ष

# संकल्प नदी संवर्धनाचा!

## विजय आसवानी यांचे आवाहन : 'श्रीं' च्या मूर्तींचे विसर्जन कृत्रिम हौदात करा

**पिंपरी। महाईन्यूज । प्रतिनिधी।**

**दोन वर्ष कोरोनामुळे सर्व सण, उत्सव साजरे करण्यास निर्बंध होते. आता पुन्हा मोठ्या उत्साहपूर्ण वातावरणात सर्वत्र गणेश उत्सव साजरा होत आहे. या आनंदाच्या काळातही वसुंधरेच्या रक्षणाबाबत जनजागृती व्हावी या उद्देशाने पिंपरीत केशव नगर येथे आसवाणी असोशिएटस् आणि ॲस्पीफ्लाय इनव्हायरमेंट या संस्थेच्या वतीने "श्रीं" च्या मूर्ती विसर्जनासाठी भव्य कृत्रिम हौदांची निर्मिती करण्यात आली आहे. येथे गणेश मूर्तींचे विसर्जन करावे आणि नदी प्रदूषण रोखण्यासाठी सहकार्य करावे असे आवाहन संयोजक विजय आसवानी आणि उद्योजक राजू आसवानी, श्रीचंद आसवानी, सतीश आसवानी, अनिल आसवानी यांनी केले आहे.**



आसवाणी असोशिएटस् आणि ॲस्पीफ्लाय इनव्हायरमेंट या संस्थेतर्फे पिंपरी गावातील वैभवनगर येथे सार्वजनिक मंडळांच्या व घरगुती गणेशमूर्ती विसर्जनासाठी लहान, मोठ्या आकाराचे एकूण तीन हौद उभारण्यात आले आहेत. याचे औपचारिक उद्घाटन पिंपरी चिंचवड मनपा आयुक्त शेखर सिंह यांच्या हस्ते रविवारी (दि.४) सायंकाळी पाच वाजता करण्यात येणार आहे अशी माहिती संयोजकांच्या वतीने प्रसिद्धीस देण्यात आली आहे.

येथे गणेश मूर्ती विसर्जित कराव्यात, असे आवाहन विजय आसवानी यांनी केले आहे. मूर्तीबरोबर असणारे निर्माल्य व सजावटीचे साहित्य वेगळे ठेवण्यासाठी स्वयंसेवक याठिकाणी सहकार्य करत आहेत.

पिंपरी चिंचवड, काळेवाडी, पिंपळेसौदागर, पिंपळेगुरव, तानाजीनगर, लिंकरोड परिसरातील नागरिकांच्या घरगुती गणपतींचे तसेच सार्वजनिक मंडळांच्या मोठ्या गणेश मूर्तींचे विसर्जन येथे करता येईल.

भाविकांसाठी विसर्जनाच्या वेळी श्रींच्या आरतीसाठी स्वतंत्र व्यवस्था आणि निर्माल्यकुंडची व्यवस्था केली आहे.

> "संयोजकांच्या वतीने विद्युत व्यवस्था व स्वच्छतागृहाची व्यवस्थाही करण्यात आली आहे. खासगी अनुभवी जीवरक्षक नेमण्यात आले आहेत. जीवरक्षक विधीवत पध्दतीने या हौदांमध्ये मूर्ती विसर्जन करतील. येथे विसर्जित केलेल्या मूर्तींचे राष्ट्रीय रासायनिक प्रयोगशाळेच्या मार्गदर्शनाखाली विघटन केले जाईल. त्यातून जमा झालेल्या मातीतून आकर्षक कुंड्या बनवून त्या कुंड्यांचे भाविकांना व गणेश मंडळांना संयोजकांच्या वतीने मोफत वाटप करण्यात येणार आहे.
>
> **- श्रीचंद आसवानी, उद्योजक.**



# औद्योगिक प्रशिक्षण संस्थेच्या विद्यार्थ्यांना सुवर्णसंधी!

## अतिरिक्त आयुक्त उल्हास जगताप: 'आयटीआय' च्या विद्यार्थ्यांचा पहिला दिवस

**पिंपरी। । महाईन्यूज । प्रतिनिधी।**

पिंपरी :औद्योगिक नगरी असलेल्या पिंपरी चिंचवड मधील उद्योगांना कुशल मनुष्यबळाची सातत्याने आवश्यकता भासत असते. औद्योगिक प्रशिक्षण संस्थांच्या माध्यमातून असे प्रशिक्षित कुशल मनुष्यबळ तयार केले जात असून या ठिकाणी प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांनी प्रामाणिकपणे प्रशिक्षण घेतल्यास त्यांना निश्चितपणे रोजगार आणि स्वयंरोजगाराची सुवर्णसंधी प्राप्त होईल, असे प्रतिपादन अतिरिक्त आयुक्त उल्हास जगताप यांनी केले.

महापालिकेच्या मोरवाडी आणि कासारवाडी येथील औद्योगिक प्रशिक्षण संस्थांमध्ये नव्याने प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांचा पहिला दिवस उत्साहाच्या वातावरणात पार पडला. या नवप्रवेशित विद्यार्थ्यांना पुष्प देऊन त्यांचे स्वागत करण्यात आले. यावेळी या विद्यार्थ्यांना महापालिका अतिरिक्त आयुक्त उल्हास जगताप यांनी मार्गदर्शन केले, त्यावेळी ते बोलत होते.



पिंपरी चिंचवड महापालिकेच्या वतीने मोरवाडी आणि कासारवाडी येथे औद्योगिक प्रशिक्षण संस्था कार्यरत आहेत. कासारवाडी येथे मुलींसाठी स्वतंत्र औद्यागिक प्रशिक्षण संस्था सुरु करण्यात आली आहे. या संस्थांच्या माध्यमातून विविध कौशल्यावर आधारित ट्रेड्स शिकवले जातात. विविध ट्रेडसाठी चालू वर्षासाठी अनेक विद्यार्थ्यांनी प्रवेश घेतला आहे. या प्रवेशीत विद्यार्थ्यांचे दि. १ सप्टेंबर २०२२ पासून नियमित प्रशिक्षण सुरू झाले आहे. अतिरिक्त आयुक्त उल्हास जगताप आणि प्राचार्य शशिकांत पाटील यांनी नवप्रवेशित विद्यार्थ्यांचे भेटवस्तू देऊन स्वागत केले. यावेळी औद्योगिक प्रशिक्षण संस्थेचे गटनिदेशक प्रकाश घोडके, ज्योत सोनावणे, शर्मिला काराबळे, निदेशक मनसरा कुमावणी, वंदना चिंचवडे, हेमाली कोंडे, सोनाली नीलवर्ण, बबिता गावंडे, योगिता कोठावदे, सीमा जाधव, सिद्धार्थ कांबळे, पूनम गलांडे, वृंदावणी बोरसे, मनोज ढेरंगे, राजकुमार तिकोणे, मंगेश कलापुरे आदी उपस्थित होते.

अतिरिक्त आयुक्त उल्हास जगताप यांनी आद्योगिक प्रशिक्षण, कंपनी आस्थापना तसेच देशाबाहेरील आस्थापनांना लागणारी कुशल मनुष्यबळाची मागणीबाबत मार्गदर्शन केले. कठोर परिश्रम, नवअविष्काराची जिज्ञासा, सृजनशील वृत्ती यातून ख-या अर्थाने विद्यार्थी परिपूर्ण घडत असतो. त्यामुळे विद्यार्थ्यांनी प्रामाणिकपणे प्रशिक्षण घेऊन आयुष्याला आकार द्यावा, असे ते म्हणाले. महापालिकेच्या वतीने औद्योगिक प्रशिक्षण संस्था आणि कौशल्य विकास केंद्राच्या माध्यमातून तरुणांमध्ये रोजगाराभिमुख कौशल्य विकसित करण्याबाबतचे प्रशिक्षण देण्यात येत असल्याचेही जगताप यांनी सांगितले.

## संपादकीय »

### प्रतीक आत्मनिर्भरतेचे !

***स्वातंत्र्याचा अमृतमहोत्सव साजरा होत असतानाच, नौदलाच्या ताफ्यात स्वदेशी बांधणीची विमानवाहू युद्धनौका समाविष्ट होणे, ही अभिमानास्पद बाब आहे.***

१९७१ च्या युद्धात गौरवशाली कामगिरी केलेल्या तत्कालीन 'आएनएस विक्रांत'चेच नाव घेऊन या दुसऱ्या विक्रांत नौकेचा जन्म झाला आहे. २० हजार कोटी रुपयांची ही विशाल, नयनमनोहर युद्धनौका म्हणजे आत्मनिर्भरतेचे व भारतीय तंत्रज्ञांच्या अविरत कष्टाचे प्रतीक आहे. कोचीन शिपयार्ड या व्यापारी जहाजबांधणीत पारंगत असलेल्या गोदीकडे 'विक्रांत'च्या उभारणीची जबाबदारी देण्यात आली होती. विमानवाहू युद्धनौका म्हणजे दीड-दोन हजार नौसैनिक राहतील, असे एक शहरच. ते बांधण्यासाठी शेकडो छोटे-मोठे उद्योग या प्रकल्पाशी जोडले गेले. या निमित्ताने एकूणच स्वदेशी उद्यमशीलतेचा विकास होत असतो, हा आणखी एक आनुषंगिक लाभ. गेले वर्षभर समुद्री चाचण्यांचा टप्पा पार केल्यावर तिचा दक्षिण कमांडमध्ये रीतसर प्रवेश झाला. अर्थात, भारतीय नौदलापुढील आव्हाने पाहता कदाचित ती पुढे पूर्व कमांडमध्ये तैनात होऊ शकेल. यामुळे पुढील काही काळ तरी पश्चिम तटावर एक आयएनएस विक्रमादित्य व पूर्व तटावर आयएनएस विक्रांत अशा दोन विमानवाहू युद्धनौका सज्ज ठेवण्याचे स्वप्न प्रत्यक्षात उतरेल. विमानवाहू युद्धनौका म्हणजे कुठेही कधीही नेता येईल, असा तरंगता विमानतळ.

अमेरिकेने त्यांच्या भूमीपासून दूर अंतरावरून युद्धे खेळताना अफगाणिस्तान व इराकच्या युद्धांमध्ये अशा तरंगत्या रणभूमींचा खुबीने वापर केला. भारताच्या कुरापती काढणाऱ्या चीन व पाकिस्तान या शेजाऱ्यांकडे कित्येक वर्षे विमानवाहू युद्धनौका नव्हत्या व त्यांची भिस्त पाणबुडी या छुप्या अस्त्रांवर अधिक होती. परंतु गेल्या दशकात चीनने अचानक विमानवाहू युद्धनौकांच्या क्षेत्रात उडी घेतली व व्यापारी जहाजावर बेतलेली पहिली विमानवाहू युद्धनौका आणली. तिच्यापाठोपाठ धडाकाच लावला. अलीकडेच चीनने जिबुटी बेटावरील आपला नौदल तळ कार्यान्वित केला. श्रीलंकेच्या हंबणटोटा बंदरात नांगरलेली संशोधक नौका किंवा पाकिस्तानच्या ग्वादार बंदराचा विकास तसेच अरबी समुद्रापर्यंत आणलेल्या पाणबुड्या यांतून चीनची समुद्री महत्त्वाकांक्षा दिसते. खासकरून हिंदी महासागरात चीन अधिक लक्ष घालत आहे. या पार्श्वभूमीवर आपल्या नौदलाच्या कार्यकक्षा विस्तारित ठेवाव्या लागणार. हिंदी महासागर व हिंद-प्रशांत क्षेत्र हे आता सुप्त संघर्ष व महत्त्वाकांक्षांचे नवे रणांगण होते आहे. भारताचा ९५ टक्के व्यापार सागरी मार्गांनी होतो.



## आनंदी सकाळ

### सुखाची झोप सहजासहजी मिळत नाही...

केवळ मनुष्यच नव्हे, तर पशू-पक्षीही झोपत असतात. फक्त त्याचे प्रमाण कमी-अधिक असते. मुंग्यांना अत्यंत कमी मुग्यांना, तर अधिक झोप वटवाघुळांना लागते. ज्यांना गरजेएवढी झोप सहजपणे आणि गोळ्या न घेता लागते, ते सुखी. आपल्या अवतीभोवती अनेक क्षेत्रांतील लोक असतात. त्यामध्ये धनवान, पदाधिकारी, आरोग्यसंपन्न, लोकजंत्री असलेले, मानसन्मान अधिक लाभलेले, वीर, बळ असणारे, पंडित, व्यापारी आणि दिन-दु:खी-पीडितही असतात. यातील कुणाला झोप चांगली लागते, हा एक संशोधनाचा विषय आहे. अनेकांना अशी ती येत नाही; यामागे कारणेही अनेक आहेत. काहींना असलेल्या संपत्तीची काळजी म्हणून, तर इतरांना ती कमावण्यासाठी होणाऱ्या धडपडीमुळे. काहींना केलेले पाप सतावते, काहींना प्रिय वस्तू आणि व्यक्तीचा वियोग त्रास देतो. भूत, भय आणि शत्रू, बिघडलेली मानसिकता, अर्थनाश गृहकलह, अपमान, पराभव, स्थानाची अस्वच्छता, ध्वनी, विपरीत हवामान यांमुळे झोपेवर परिणाम होतो.

## महाराष्ट्राची एक खरी ओळख गणेशोत्सव






गणेशोत्सव ही महाराष्ट्राची एक खरी ओळख आहे. यंदाचाही उत्सव त्याला अपवाद नाही. कोविडच्या दोन वर्षांच्या खंडानंतर यंदा हा उत्सव होत असल्याने त्यातील उत्साहाला उधाण आले आहे. पहिल्या दोन-तीन दिवसांमध्येच रस्त्यावरील गर्दीने उच्चांक केले आहेत. अजून साप्ताहिक सुट्ट्या यायच्या आहेत. त्या वेळेस रस्त्यावरील गर्दी आणखी वाढेल. इतकेच नव्हे, तर या वेळेस मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी हा उत्सव साजरा करण्यासाठी कोणतेही निर्बंध नसल्याची घोषणा केल्याने राज्यातील प्रशासनही कोणतेही निर्बंध किंवा त्यासाठी कोणतेच नियम करण्याच्या फंदात पडलेले नाही. साहजिकच, सगळीकडे आनंदी आनंद आहे.

अर्थात, ही सगळी एक बाजू झाली. शंभर-सव्वाशे वर्षांपूर्वी या उत्सवाची सुरूवात झाली. लोकमान्य टिळकांनी काळाची गरज म्हणून गणपतीला देवघरातून सार्वजनिक मंडपात आणले. पुण्यात हा उत्सव सुरू झाला. थोड्याच काळात संपूर्ण महाराष्ट्राने तो आपलासा केला. आज महाराष्ट्रातील प्रत्येक गावात, शहरात शतकपूर्ती केलेले सार्वजनिक गणेश मंडळ आहे. काळाच्या ओघात हा उत्सवाने अनेक बदल पाहिले. फार पूर्वी या उत्सवाच्या निमित्ताने मेळे होत. पोवाड्यांचे जाहीर कार्यक्रम व्हायचे. तत्कालीन ब्रिटिश सरकराच्या विरोधात वातावरण तयार करण्यास त्यांचा मोठा हातभार लागला. स्वातंत्र्यानंतर त्याची जागा व्याख्यानांनी व सांस्कृतिक कार्यक्रमांनी घेतली. या उत्सवाच्या काळात अगदी रस्त्यावरच्या मैफलींमध्ये स्वरभास्कर पं. भीमसेन जोशी यांच्यापासून अनेक दिग्गज कलाकार आवर्जून सहभागी होत. शास्त्रीय संगीत महाराष्ट्राच्या घराघरात आणि मराठी माणसाच्या मनामनात पोहोचविण्यात गणेशोत्सवाने मोठा हातभार लावला. इतकेच नव्हे तर त्या काळात प्रसिद्ध असलेल्या भावगीत गायनालाही या उत्सवानेच व्यासपीठ दिले. गजाननराव वाटवे, बबनराव नावडीकर, मालती पांडे यासारख्या सुप्रसिद्ध गायकांनी या व्यासपीठावरून मराठी मने संपन्न केली. मराठी अभिरूची जोपासली गेली, ती अशाच उपक्रमांमधून.

अर्थात फक्त सांस्कृतिक कलावंतच नव्हे तर अनेक मूर्तिकार, चित्रकार, नेपथ्यकार यांनाही या उत्सवाने व्यासपीठ दिले. स्थानिक म्हणजेच अगदी मंडळाच्या पातळीवरील कलाकारांपासून सिनेसृष्टी गाजविणाऱ्या अनेक कलाकारांनी आपली कला सादर केली. गणपतीसोबत तयार केलेले देखावे ही महाराष्ट्राची ओळख बनली. पौराणिक, ऐतिहासिक घटनांबरोबरच अगदी ताज्या घटनांवर भाष्य करणारे देखावे, विज्ञान-तंत्रज्ञानातील घडामोडींचा वेध घेणारे देखावे हे उभ्या महाराष्ट्राचे ज्ञानवर्धन करीत होते.

## ऑनलाइन जुगाराचे संकट

**कोव्हिड आणि लॉकडाउनच्या काळात सोशल मीडिया, वृत्तपत्रे, टीव्ही यांवर भरपूर पैसे व बक्षिसे मिळण्याचे सोपे साधन म्हणून जुगारी खेळांच्या मोठमोठ्या जाहिराती सातत्याने दिसू लागल्या.**

ऑनलाइन रम्मी, ड्रीम इलेव्हन, विन्झो यांसारखे अनेक जुगारी खेळ खेळण्याचे मोठमोठे सेलिब्रिटी जाहिरातीतून आवाहन करू लागले. मग हळूहळू कोणी किती लाख कमावले, किती कोटी रुपये मिळाले, कशी महागडी गाडी घेतली, कशी जीवनशैली सुखासीन झाली असे दावे करणारे व्हिडिओ व्हायरल होऊ लागले. सर्वांच्या तोंडात वेगवेगळ्या गेम्सची नावे ऐकू येऊ लागली. भलीभली माणसे नाकासमोर मोबाइल धरून गेम्स खेळतांना दिसू लागली. लॉकडाउनच्या काळात शाळा, कॉलेज, अभ्यास, परीक्षा, ऑफिसची कामे, वर्क फ्रॉम होम सारे काही मोबाइल, कम्प्युटर आणि इंटरनेटच्याच आधारे चालू असल्याने लहानांपासून ते मोठ्यांपर्यंत कधी या जुगारी खेळांच्या कराल दाढेत गेले हे कुणाच्या लक्षातच आले नाही. या सर्व खेळांचे गंभीर दुष्परिणाम गेल्या वर्षभरापासून समोर येत आहेत. खूप मोठा जनसमुदाय, विशेषत: तरुणाई या जुगारी खेळांमध्ये अडकली आहे. दुर्दैवाने, पालकांना मुले नेमके काय



करताहेत याची कल्पना नाही.

जुगारी खेळांमुळे कर्जबाजारी होऊन घरदार विकण्याची वेळ आलेली कुटुंबे, खासगी सावकारांकडून उधार पैसे घेऊन हरलेले आणि घरातून पळून गेलेली मुले आणि या गेम्समुळे आत्महत्या करणाऱ्यांची वाढलेली चिंतादायक संख्या अशी अनेक प्रकरणे समुपदेशकांकडे व डॉक्टरांकडे आता येत आहेत. याबाबत मोठ्या प्रमाणावर जागृती करण्याची वेळ आल्याचे व्यक्तिगत समुपदेशन करताना जाणवत आहे. हे काम आता केले नाही तर समाजाचे न भरून येणारे नुकसान होऊ शकते. 'या खेळात आर्थिक जोखीम आहे आणि खेळाची सवय लागू शकते,' अशी सावधगिरीची सूचना या सर्व गेम्सच्या जाहिरातींत तळात असते. वास्तविक, या जाहिरातींत 'सवय' हा शब्द न वापरता 'व्यसन' असे लिहायला हवे. याबाबत आम्ही संबंधित अधिकारी आणि प्रशासनाला कळविले होते. त्यानंतर काही जाहिरातींत 'व्यसन' हा शब्द वापरला जाऊ लागला; मात्र अजूनही बऱ्याच ठिकाणी 'सवय' हाच शब्दप्रयोग होतो.

व्यसन ही एक विकृती आहे. मनोविकृती मानसशास्त्रानुसार विवेक आणि नियंत्रण गमावलेल्या जुगारी व्यक्तीला जुगार विकृती (पॅथॉलॉजिकल गॅम्बलिंग डिसऑर्डर) जडलेली आहे, असे मानण्यात येते. थोडक्यात जुगाराची विकृती हा एक मानसिक आजार आहे. आपण सर्वच जण आयुष्यात कधी ना कधी नशीब आजमावण्याचा प्रयत्न करून बघत असतो. कोणी लॉटरीचे तिकिट घेतो, काहीजण पत्ते खेळतात, कोणी मटका खेळतो, कोणी सट्टा लावतो, काहीजण घोड्यांच्या रेसमध्ये पैसे लावतात आणि आजकाल हे सर्व नशीब आजमावण्याचे खेळ ऑनलाइन चालू झाले आहेत. आम्ही लहानपणी दिवाळीत सोरट खेळायचो.

## ।। अभंगवाणी ।।



एकादशीव्रत सोमवार न करिती ।
कोण त्यांची गति होइल नेणों ।।१।।
काय करूं बहु वाटे तळमळ ।
आंधळीं सकळ बहिर्मुख ।।ध्रु.।।

**- संत तुकाराम**

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक संपादक अधिकराव दिवे- पाटील** यांनी गाळा क्रमांक 79-80 छत्रपती शिवाजी महाराज गोल मंडई, संत तुकाराम नगर, अग्निशमन केंद्रासमोर, पिंपरी, पुणे - 411018. **'महाईन्यूज'**च्या पुणे विभागीय कार्यालयामधून प्रकाशित केले आहे. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक संपादक सहमत असतीलच असे नाही. **कार्यकारी संपादक : *सुनील आढाव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) एमएसएमई क्रमांक : MH-26-0158827. (विशेष सूचना: हा अंक प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.)

## राष्ट्रीय सुरक्षा सल्लागार अजित डोवाल मुंबईत दाखल

मुंबई । महाईन्यूज । प्रतिनिधी।



राष्ट्रीय सुरक्षा सल्लागार अजित डोवाल यांनी मुख्यमंत्री आणि राज्यपालांची मुंबईत भेट घेतली. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे राष्ट्रीय सुरक्षा सल्लागार अजित डोवाल सध्या मुंबईत दाखल झाले आहेत. दौऱ्यादरम्यान डोवाल यांनी आज राज्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची वर्षा निवासस्थानावर भेट घेतली. डोवाल आणि मुख्यमंत्र्यांची ही सदिच्छा भेट असल्याचं सांगण्यात येत आहे. डोवाल यांनी सकाळीच महाराष्ट्राचे राज्यपाल भगतसिंह कोश्यारी यांचीही भेट घेतली होती. जवळपास अर्धा तास विविध मुद्द्यांवर त्यांनी चर्चा केली. केंद्रीय गृहमंत्री अमित शाह ५ सप्टेंबर रोजी महाराष्ट्र दौऱ्यावर आहेत.

# दसरा मेळाव्यावरून संघर्ष टाळा! : पवार

### मुख्यमंत्र्यांना आवाहन, मेळावे घेण्याचा सर्वांना अधिकार

मुंबई । महाईन्यूज ।

वार्षिक दसरा मेळाव्यावरून शिवसेनेची कोंडी केली जात असताना संघर्षाची भूमिका न घेता सर्वसमावेशक भूमिका घ्यावी, असे आवाहन राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष शरद पवार यांनी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना केले आहे. दसरा मेळाव्यावरून राज्यात वाद होत आहे. मेळावे घेण्याचा सर्वांना अधिकार आहे. पण यावरून वाद टाळले पाहिजेत.

सामोपचाराने यावर तोडगा काढता येईल, असेही पवार यांनी म्हटले आहे. दसरा मेळाव्यावरून शिंदे गट, भाजप सारेच शिवसेनेची कोंडी करीत असताना एकाकी पडलेल्या शिवसेनेच्या मदतीला राष्ट्रवादी



धावून आला आहे. विरोधी पक्षनेते अजित पवार यांनीही शिवसेनेला शिवाजी पार्कमध्ये मेळावा घेण्याचा अधिकार असल्याचे सांगितले. आगामी सार्वत्रिक निवडणुकीत विरोधकांची मोट बांधण्याच्या प्रयत्नाचा भाग म्हणून बिहारचे मुख्यमंत्री नितीशकुमार हे येत्या गुरुवारी (८ सप्टेंबर) राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष शरद पवार यांची नवी दिल्लीत भेट घेणार आहेत. आगामी निवडणुकीत पंतप्रधानपदाचा चेहरा म्हणून आपण स्पर्धेत नसल्याचे शरद

सामोपचाराने यावर तोडगा काढता येईल, असेही पवार यांनी म्हटले आहे. दसरा मेळाव्यावरून शिंदे गट, भाजप सारेच शिवसेनेची कोंडी करीत असताना एकाकी पडलेल्या शिवसेनेच्या मदतीला राष्ट्रवादी धावून आला आहे. विरोधी पक्षनेते अजित पवार यांनीही शिवसेनेला शिवाजी पार्कमध्ये मेळावा घेण्याचा अधिकार असल्याचे सांगितले.

पवार तसेच नितीशकुमार या दोघांनीही स्पष्ट केले आहे. पण विरोधकांची संयुक्त मोट बांधण्यासाठी प्रयत्न करू, असे उभयतांनी म्हटले आहे.

## वृद्धाश्रमाच्या विस्ताराला आर्थिक साह्याची गरज

रत्नागिरी । महाईन्यूज । प्रतिनिधी।



ज्येष्ठांना त्यांच्या आयुष्याची संध्याकाळ शांत आणि निवांतपणे जगता यावी यासाठी धडपडणाऱ्या सिंधुदुर्ग जिल्ह्यातील 'दिविजा' वृद्धाश्रमाच्या महत्त्वाकांक्षी प्रकल्पाला मदतीचा हात हवा आहे. 'दिविजा'तील ज्येष्ठ नागरिकांना उत्तम दर्जाच्या सेवा-सुविधा पुरविण्यासाठी सुमारे तीन कोटी रुपये खर्चाचा प्रकल्प 'स्वस्तिक फाऊंडेशन'ने हाती घेतला आहे. अडचणी अनेक आहेत, परंतु दानशूरांचा आर्थिक हातभार लागला तर हा प्रकल्प साकारणे सोपे होणार आहे.

मुंबई-गोवा महामार्गावरील खारेपाटणच्या पुढे नांदगाव तिठ्याजवळ असूलदे गाव आहे. तिथे 'स्वस्तिक फाऊंडेशन'चा हा वृद्धाश्रम आहे. सध्या तेथे ४२ आजी-आजोबा वास्तव्य करतात. त्यापैकी बहुसंख्य निराधार आहेत, तर काही जण कुटुंबीयांपासून विभक्त होऊन आयुष्याचा उर्वरित काळ शांतपणे व्यतीत करीत आहेत. 'दिविजा'मध्ये त्यांना सर्व प्रकारच्या सोयी-सुविधा पुरवल्या जातात. त्याचबरोबर, त्यांची आजारपणे आणि मानसिक आरोग्याचीही काटेकोर काळजी घेतली जाते. 'दिविजा'तील ज्येष्ठांचे मन सकारात्मक गोष्टींमध्ये गुंतवण्यासाठी संस्थेच्या अध्यक्ष दीपिका रांबाडे आणि सचिव संदेश शेट्ये अहोरात्र मेहनत घेतात. त्यांच्याबरोबर १२ जणांचा मदतनिसांचा चमूही पूर्णवेळ कार्यरत आहे. अलीकडेच आश्रमातील एका आजींचे निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर एका महिला मदतनीसाने अंत्यसंस्कार केले. यावरून मदतनीसांचा चमूही 'दिविजा'च्या कामाशी किती समरस झाला आहे, याची प्रचीती येते.

## मुंबई मनपा काबीज करण्यासाठी भाजपा दंगल घडवण्याचा प्रयत्न करेल

### भास्कर जाधवांचे गंभीर आरोप

गुहागर । महाईन्यूज । प्रतिनिधी।

एकनाथ शिंदे यांनी बंड करून महाविकास आघाडी सरकार पाडल्यापासून शिंदे गट आणि महाविकास आघाडीतील नेत्यांमध्ये आरोप-प्रत्यारोप होत आहेत. दरम्यान दहीहंडी व आणि आता गणेशोत्सवातील गाठीभेटीवरून मुंबई पालिका निवडणुकासाठी समीकरणांची जुळवाजुळव सुरू झाली आहे. मुंबई महानगरपालिका निवडणूक येत्या दोन-तीन महिन्यात कधीही जाहीर होऊ शकते. यामुळे सर्वच राजकीय पक्षांनी तयारी सुरू केली आहे. या पार्श्वभूमीवर शिवसेनेचे नेते भास्कर जाधव यांनी भाजपवर गंभीरा आरोप केले आहेत. यावेळी मुंबई महापालिकेसाठी भाजप दंगल घडवण्याचा प्रयत्न करेल, राज्यातील मुस्लिम बांधवांनी भाजपचा डाव वेळीच ओळखावा, असे आवाहनही जाधव यांनी केले आहे.

मुंबई पालिका निवडणुकीवरून राजकारण तापले आहे. सत्ताधारी



आणि विरोधकांकडून आरोप-प्रत्यारोपाला सुरुवात झाली आहे. भास्कर जाधव यांच्या विधानाचा व्हिडिओ सोशल मीडियावर चांगलाच व्हायरल होत आहे. भास्कर जाधव यांनी गुहागर येथील एका कार्यक्रमात बोलताना हे विधान केले.

मुंबई महानगरपालिका निवडणूकीच्या पार्श्वभूमीवर शिवसेना आणि भाजपमध्ये कलगीतुरा रंगला आहे. या पार्श्वभूमीवर शिवसेना नेते भास्कर जाधव यांनी भाजपला लक्ष्य केले आहे. यावेळी ४० आमदार फोडून देखील लोकांचा आपल्याला पाठिंबा नाही हे भाजपच्या लक्षात आले आहे. त्यामुळे आता भाजप दोन समूहात दंगल भडकवण्याचा प्रयत्न करेल. काहीही करून मुस्लिम तरुणांनी डोके शांत ठेऊन भाजपचा डाव ओळखावा व मुंबई महानगरपालिकेत पुन्हा शिवसनेनेला सत्तेत आणा, असे आवाहन भास्कर जाधव यांनी मुस्लिम समुदायाला केले

### शिंदे गटातील आमदारांना आव्हान

गुहागरमधील सभेत शिवसेना नेते भास्कर जाधव यांनी बंडखोर आमदारांना खुले आव्हान दिले. हिंमत असेल तर राजीनामा देऊन जनमताला सामोरे जा,असे भास्कर जाधव म्हणाले. यावेळी त्यांनी रामदास कदम व नारायण राणे यांच्यावरही निशाणा साधला. यावर आता भाजपकडून काय प्रतिक्रिया येते? हे पाहणे उत्सुकतेचे ठरणार आहे.

## शिवसेना- शिंदे गटात बुलढाण्यात गटात संघर्ष!

### खुर्च्यांची फेकाफेक, लाथाबुक्क्यांनी मारहाण

बुलढाणा । महाईन्यूज । प्रतिनिधी।

शिवसेना आणि शिंदे गटातील शनिवारी संघर्ष झाला. बुलढाणा बाजार समितीत पोलीस बंदोबस्तात सुरू असलेल्या शिवसेनेच्या सत्कार कार्यक्रमात शिंदे गटातील कार्यकर्त्यांनी धुडगूस घातला. यात सेनेचे उपनेते लक्ष्मण वडले यांच्यासह काही पदाधिकाऱ्यांना लक्ष्य करण्यात आले. शिवसेनेचे संपर्क प्रमुख नरेंद्र खेडेकर, जिल्हाप्रमुख जालिंदर बुधवत, उपजिल्हाप्रमुख संजय हाडे यांच्यासह उपनेते लक्ष्मण वडले यांना धक्काबुक्की करण्यात आली. हल्ला करणाऱ्यांत आमदार संजय गायकवाड यांचे पुत्र कुणाल गायकवाड तसेच त्यांचे सहकारी आघाडीवर होते, असा आरोप खेडेकर यांनी केला आहे. यासंदर्भात अनेक चित्रफिती प्रसारित झाल्या आहेत. सुमारे १५ मिनिटे चाललेल्या हाणामारीत पोलिसांनी बघ्याची



भूमिका घेतल्याचा आरोपही त्यांनी केला. यावेळी खुच्र्याची फेकाफेक करीत लाथाबुक्क्यांनी मारहाण करण्यात आली. घटनेनंतर पोलिसांची अतिरिक्त कुमक दाखल झाल्यामुळे हल्ला करणाऱ्या शिंदे गटातील कार्यकर्त्यांनी पोबारा केला.

जिल्ह्यात फिरू देणार नाही- गायकवाड शेतकऱ्यांची संस्था असलेल्या बाजार समितीत एकतर राजकीय कार्यक्रम घेतला आणि त्यात आमच्या नेत्यांबद्दल गलिच्छ भाषा वापरली. आजची घटना म्हणजे त्याची संतप्त प्रतिक्रिया होय. यापुढे आमच्या नेत्यांबद्दल गलिच्छ विधाने केल्यास जिल्ह्यात फिरू देणार नाही, असा इशारा शिंदे गटाचे आमदार संजय गायकवाड यांनी दिला. आम्ही संयम पाळला – बुधवत हल्ला होऊनही आम्ही संयम बाळगला, अन्यथा अनर्थ झाला असता. मी शिवसैनिकांना, संयम बाळगण्याचे आवाहन केले, शांत ठेवले. अन्यथा हल्लेखोर केवळ दहाबारा आणि कार्यक्रमाला तीनएकशे सैनिक हजर होते, अशा सूचक शब्दात जिल्हाप्रमुख जालिंदर बुधवत यांनी आपली भूमिका मांडली.

## शॉर्ट न्यूज

### नासाच्या अर्टेमिस रॉकेटच्या प्रक्षेपणाची पुन्हा तयारी

।केप कॅनाव्हेरल। महाईन्यूज । प्रतिनिधी।

पाच दिवसांपूर्वी तांत्रिक बिघाडामुळे ज्याचे प्रक्षेपण



लांबणीवर टाकण्यात आले, त्या अर्टेमिस या चांद्र मोहिमेतील रॉकेटच्या प्रक्षेपणाची सज्जता शनिवारी केनेडी अंतराळ केंद्रावर पुन्हा सुरू झाली. नासाची ही एक मानवविरहित चाचणी चांद्रमोहीम आहे. अखेरच्या अपोलो चांद्रमोहिमेनंतर ५० वर्षांनी नासाने चंद्रापासून ते मंगळापर्यंतची अर्टेमिस मोहीम हाती घेतली आहे. त्याअंतर्गत ३२ मजल्यांइतक्या उंचीचे एलएलएस रॉकेट हे त्याच्या मूळ कॅप्सूलसह फ्लोरिडाच्या केप कॅनाव्हेरल येथून स्थानिक वेळेनुसार दुपारी २.१७ वाजता उड्डाण करील, असे नियोजन करण्यात आले आहे.

# गुजरात दंगल प्रकरणात तीस्ता सेटलवाड यांना जामीन!

## सर्वोच्च न्यायालयाने अंतरिम जामीन मंजूर केला

हेरात । महाईन्यूज । प्रतिनिधी।

सामाजिक कार्यकर्त्या आणि पत्रकार तीस्ता सेटलवाड यांना शुक्रवारी (२ सप्टेंबर) सर्वोच्च न्यायालयाने अंतरिम जामीन मंजूर केला आहे. २००२ साली गुजरातमध्ये झालेल्या जातीय दंगलीत सरकारमधील उच्च अधिकाऱ्यांना गुंतवण्यासाठी बनावट कागदपत्रे सादर केल्याचा आरोप त्यांच्यावर आहे. सेटलवाड यांच्या याचिकेवर भारताचे सरन्यायाधीश यू यू लळित यांच्या नेतृत्वाखालील खंडपीठाने सुनावणी केली. त्यात न्यायमूर्ती रवींद्र भट आणि सुधांशू धुलिया यांचाही समावेश होता.

गुजरात विशेष तपास पथकाने (एसआयटी) काही दिवसांपूर्वी गुजरात दंगल प्रकरणी आरोप असलेल्या गुजरात सरकारच्या उच्च अधिकाऱ्यांना आणि तत्कालीन गुजरातचे मुख्यमंत्री नरेंद्र मोदी यांना क्लीन चिट दिली आहे. या क्लीन चिटला आव्हान देणारी याचिका दंगल पीडित झाकिया जाफरी यांनी सर्वोच्च न्यायालयात दाखल केली. यावर्षी २४ जून रोजी न्यायालयाने ही



याचिका फेटाळून लावल्यानंतर हे प्रकरण सेटलवाड यांच्या अटकेपर्यंत येऊन पोहोचलं. २४ जून २०२२ रोजी, सर्वोच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती ए एम खानविलकर, न्यायमूर्ती दिनेश माहेश्वरी आणि सी टी रविकुमार यांच्या खंडपीठाने जाफरी यांची याचिका फेटाळून लावली होती. यावेळी न्यायालयाने याचिकाकर्त्यांना फटकारलं होतं. ही याचिका चुकीच्या हेतूने दाखल करण्यात आली आहे. कायद्याच्या प्रक्रियेचा गैरवापर करणाऱ्यांवर कठोर कारवाई करावी, असा निर्णय न्यायालयाने दिला होता. तसेच गुजरातच्या असंतुष्ट अधिकाऱ्यांनी गुजरात दंगल प्रकरणात बनावट पुरावे सादर केल्याचं गुजरात एसआयटीने उघडकीस आणल्याचंही न्यायालयाने सांगितलं होतं.

न्यायालयाच्या या निर्णयानंतर दुसऱ्या दिवशी, २५ जून रोजी अहमदाबाद डिटेक्शन ऑफ क्राईम ब्रँच (DCB) ने गुजरातचे निवृत्त डीजीपी आर बी श्रीकुमार आणि तीस्ता सेटलवाड यांना अटक केली. निवृत्त डीजीपी आर बी श्रीकुमार यांच्या भूमिकेवर न्यायालयाने आधीच प्रश्नचिन्ह उपस्थित केले होते. तर याचिकाकर्त्या झाकिया जाफरी यांना पाठिंबा दिल्याचा आरोप तीस्ता सेटलवाड यांच्यावर केला होता. एका पोलीस अधिकाऱ्याने दाखल केलेल्या एफआयआरच्या आधारे श्रीकुमार आणि सेटलवाड यांच्यावर गुन्हेगारी कट रचणे, बनावट पुरावे सादर करणे आणि IPC च्या इतर कलमाअंतर्गत गुन्हा दाखल केला. या एफआयआरमध्ये माजी आयपीएस अधिकारी संजीव भट्ट यांचेही नाव होतं. पण संजीव भट्ट सध्या दुसऱ्या एका प्रकरणात तुरुंगात आहेत.

या घटनाक्रमानंतर सेटलवाड यांनी जामीन मिळवण्यासाठी अहमदाबाद न्यायालयात अर्ज दाखल केला, पण ३० जुलै रोजी अहमदाबाद न्यायालयाने त्यांना जामीन नाकारला. यानंतर गुजरात उच्च न्यायालयाने सुनावणीची तारीख १९ सप्टेंबर निश्चित केली. केवळ

# पेटीएम, रेझर पे आणि 'कॅश फ्री'वर इडीचे छापे

## गेटवे कंपन्यांच्या बंगळूरु येथील 6 कार्यालयांवर सक्तवसुली

नवी दिल्ली । महाईन्यूज ।

ॲपआधारित झटपट कर्जमंजुरीतील गैरव्यवहाराच्या आरोपांवरून रेझरपे, पेटीएम आणि कॅशफ्री या ऑनलाइन पेमेंट गेटवे कंपन्यांच्या बंगळूरु येथील सहा कार्यालयांवर सक्तवसुली संचालनालयाने (ईडी) शनिवारी छापे घातले. हे कर्जआधारित ॲप्स चिनी व्यक्तीमार्फत नियंत्रित केले जातात, असे 'ईडी'ने सांगितले.

ॲप्सआधारित झटपट कर्ज घेतलेल्या अनेकांनी आत्महत्या केल्याच्या घटना उजेडात आल्यानंतर 'ईडी'ने बेहिशोबी संपत्ती प्रतिबंध कायद्याच्या (पीएमएलए) फौजदारी कलमांखाली चौकशी सुरू केली. स्थानिक पोलिसांनी दाखल केलेल्या गुन्ह्यांतून कर्जदारांचा छळ केला जात होता, हे स्पष्ट झाल्यापासून या कंपन्यांवर ईडीची करडी नजर होती. झटपट कर्ज मिळवून देणाऱ्या कंपन्या ॲप्सच्या माध्यमांतून कर्जदाराच्या व्यक्तिगत माहितीच्या आधारे त्यांना निर्दयपणे धमकावत असत, असे निष्पन्न झाले होते. या तीन कंपन्यांच्या



कार्यालयांची शुक्रवारपासून झडती सुरू आहे. त्यांच्यावरील छाप्यांदरम्यान, कंपन्यांशी संबंधित व्यापारी खाती आणि या चिनी व्यक्तीनियंत्रित संस्थांच्या बँक खात्यांवरील १७ कोटी रुपयांची रक्कम जप्त करण्यात आल्याचे ईडीने शनिवारी संध्याकाळी सांगितले. रेझरपे, पेटीएम, कॅशफ्री या पेमेंट गेटवे कंपन्या २०२० पासून म्हणजे करोना साथीचा उद्रेक झाल्यानंतर लगेचच ईडीच्या संभाव्य कारवाईच्या यादीवर अग्रस्थानी होत्या. 'ईडी'ला तपासात सहकार्य करीत असल्याचा दावा रेझरपे आणि कॅशफ्रीने केला आहे, तर पेटीएमने मात्र प्रतिक्रियेस नकार दिला. 'पेटीएम'मध्ये चिनी कंपनी 'अलिबाबा'ची मोठी गुंतवणूक आहे. 'ईडी'ने दिलेल्या माहितीनुसार काही चिनी नागरिकांनी भारतीय चार्टर्ड अकाऊंटंट आणि संचालकांच्या मदतीने विविध भारतीय कंपन्या सुरू केल्या. त्यानंतर हे चिनी नागरिक भारतात आले.

# नितीश कुमारांना झटका !

## मणिपूरमध्ये जदयूचे सहापैकी 5 आमदार भाजपात

।नवी दिल्ली । महाईन्यूज ।

बिहारमध्ये मुख्यमंत्री नितीश कुमार यांनी युती तोडल्यानंतर भाजपाने जनता दल युनायटेडला एकापाठोपाठ एक झटके देण्यास सुरुवात केली आहे. नितीश कुमार यांच्या जदयूचे मणिपूरमधील सहापैकी पाच आमदारांनी भाजपात प्रवेश केला आहे. या आधी अरुणाचलमधील जदयूचा एकमेव आमदार भाजपात सामील झाला होता. महाराष्ट्रात जूनमध्ये सत्तांतर होऊन शिवसेना-भाजपाचे सरकार स्थापन झाले. त्यानंतर अवघ्या 10 दिवसांच्या आत बिहारमध्येही सत्तांतर झाले. जदयूने भाजपाशी काडीमोड घेत राष्ट्रीय जनता दल आणि काँग्रेससह सरकार स्थापन केले. केंद्रीय मंत्री अमित शहा हे सातत्याने जेडीयूमध्ये फूट पाडण्याचे काम करत असल्याचा आरोप नितीश कुमार यांनी केला होता. पक्षाचे माजी नेते आरसीपी सिंह हे अमित शहा यांचे प्यादे



म्हणून काम करत असल्याचा दावाही त्यांनी केला होता. तर बिहारचे मुख्यमंत्री नितीश कुमार यांच्यावर जनतेच्या जनादेशाचा अपमान आणि विश्वासघात केल्याचा आरोप भाजपने केला.

आता भाजपाने जदयूला एकापाठोपाठ एक धक्के देण्यास सुरुवात केली. मणिपूरमध्ये जदयूचे पाच आमदार शुक्रवारी सत्ताधारी भाजपात सामील झाले. त्याला विधानसभा अध्यक्षांनी मंजुरी दिल्याचे मणिपूर विधानसभा सचिव मेघजीत सिंह यांनी एका निवेदनात म्हटले आहे. मणिपूरमध्ये यंदा मार्च महिन्यात झालेल्या विधानसभा निवडणुकीत नितीश कुमार यांच्या जदयूने 38 जागा लढविल्या होत्या. त्यापैकी सहा जागा जदयूने जिंकल्या. त्यातील जायकिशन, एन. सनाटे, मोहम्मद अचब उद्दीन, माजी डीजीपी एल. एम. खौटे और थंगजाम अरुणकुमार यांनी भाजपात प्रवेश केला. विशेष म्हणजे, खौटे आणइ अरुणकुमार हे भाजपामधून निवडणूक लढविण्यास इच्छुक होते.

### अरुणाचलची पुनरावृत्ती!

याआधी 24 ऑगस्टला अरुणाचल प्रदेशात जदयूचे एकमवे आमदार तेकी कासो यांनी भाजपात प्रवेश केला होता. 2019च्या राज्य विधानसभा निवडणुकीत जदयूचे सात उमेदवार विजयी झाले होते. त्यापैकी सहा आमदार आधीच भाजपात सामील झाले होते. त्यानंतर उरलेल्या एका आमदाराने देखील भाजपात प्रवेश केला. आता मणिपूरमध्येही जदयूचा एकमेव आमदार राहिला आहे.

# काँग्रेसच्या अध्यक्षपद निवडणुकीची मतदारयादी जाहीर करा !

## काँग्रेसचे ज्येष्ठ नेते शशी थरूर यांची मागणी

नवी दिल्ली । महाईन्यूज । प्रतिनिधी।

काँग्रेसमध्ये अध्यक्षपदाच्या निवडीवरून प्रचंड घमासान सुरू आहे. काँग्रेसचा पुढील अध्यक्ष कोण होणार यावर अद्यापही शिक्कामोर्तब झालेलं नाही. दरम्यान, या पदासाठी काँग्रेसने निवडणूक कार्यक्रम जाहीर केला आहे. त्यामुळे अखिल भारतीय काँग्रेस समिती अध्यक्षपद निवडणुकीची मतदारयादी प्रकाशित करावी अशी मागणी काँग्रेसचे ज्येष्ठ नेते शशी थरूर (Shashi Tharur) आणि आसामचे खासदार प्रद्युत बोरदोलोई (Pradyut Bordolai) यांनी केली आहे. काँग्रेसचे केंद्रीय निवडणीक



प्राधिकरणाचे प्रमुख मधुसूदन मिस्त्री यांना या दोघांनी पत्र लिहून मतदारयादीची मागणी केली आहे. काँग्रेसचा पुढचा अध्यक्ष कोण होणार यावरून वाद सुरू आहेत. राहुल गांधी यांनी पुढील अध्यक्ष व्हावं अशी मागणी काँग्रेसमधील अनेक नेत्यांनी केली आहे. मात्र, राहुल गांधी इच्छूक नसल्याचं सांगण्यात येतंय. तसंच, राजस्थानचे मुख्यमंत्री अशोक गेहलोत यांच्यासह अनेक ज्येष्ठ नेत्यांची नावे अध्यक्ष पदाच्या शर्यतीत आहेत. त्यामुळे पुढचा अध्यक्ष गांधी कुटुंबाच्या बाहेरचा होणार का याकडे साऱ्यांचे लक्ष आहे. दरम्यान, काँग्रेसने अध्यक्षपदासाठी निवडणूक जाहीर केली आहे. त्यानुसार, मतदारयादी जाहीर करण्याची मागणी शशी थरूर आणि प्रद्युत बोरदोलोई यांनी केलीय. निवडणुकीसाठी उमेदवारी अर्ज प्रक्रियेत १० सूचकांचा समावेश करण्यात आलाय. काँग्रेस समितीचे प्रतिनिधीच सूचक असतील. त्यामुळे त्यांची नावे समजणे आवश्यक असल्याचं या पत्रात म्हटलं आहे. त्यांचं नाव अंतिम यादीत न आल्यास उमेदवारी अर्ज रद्द होऊ शकतो, असं थरूर यांनी म्हटलं आहे.

# दिवाळीत देशभरात घुमणार शिवगर्जना

## मराठीसह हिंदी, तमिळ, तेलगु आणि कन्नड मध्ये प्रदर्शित होणार हर हर महादेव छत्रपती शिवरायांच्या भूमिकेत दिसणार सुबोध भावे

झी स्टुडिओजच्या हर हर महादेव या भव्य दिव्य चित्रपटाची घोषणा झाल्यापासूनच या चित्रपटात कोणकोणते कलाकार असतील आणि मुख्य म्हणजे यात छत्रपती शिवाजी महाराजांची व्यक्तिरेखा कोण साकारणार याबद्दल प्रेक्षकांच्या मनात उत्सुकता होती. नुकतंच या चित्रपटाचं डिजीटल पोस्टर प्रदर्शित करण्यात आलं असून याद्वारे या प्रश्नाचं उत्तर मिळालेलं आहे. मराठीतील हरहुन्नरी आणि बहुआयामी अभिनेता अशी ओळख असलेला सुबोध भावे या चित्रपटात छत्रपती शिवरायांच्या भूमिकेत दिसणार आहे. छत्रपती शिवरायांच्या कार्याची ख्याती आणि कीर्ती ही केवळ महाराष्ट्रातच नाही तर देशभर पसरलेली आहे. देशभरातील लोकांसाठी आजही शिवाजी महाराज हे प्रेरणास्रोत आहेत. हीच बाब लक्षात घेऊन या चित्रपटाच्या माध्यमातून छत्रपतींचं कार्य जास्तीत जास्त लोकांपर्यंत पोहचावं या उद्देशाने हा भव्य दिव्य चित्रपट मराठीसह हिंदी, तमिळ, तेलगु आणि कन्नड भाषेतून प्रदर्शित करण्याचा निर्णय झी स्टुडिओजने घेतलेला आहे. येत्या दिवाळीत पाच भारतीय भाषांमध्ये एकाच दिवशी प्रदर्शित होणारा हा पहिलाच मराठी चित्रपट ठरणार आहे हे विशेष.

हर हर महादेव चित्रपटात अनेक नामवंत कलाकारांची मांदियाळी असणार आहे. त्यातील एक प्रमुख भूमिकेतील नाव म्हणजे सुबोध भावे. या भूमिकेबद्दल बोलताना सुबोध भावे म्हणाले की, "छत्रपती शिवाजी महाराज म्हटलं की मनात आपसूकच आदराची आणि अभिमानाची भावना निर्माण होते. केवळ मराठी माणूसच नव्हे तर इतर भाषिकांसाठीही अखंड प्रेरणेचं उर्जास्रोत म्हणजे छत्रपती शिवाजी महाराज. अशा या रयतेच्या राजाची भूमिका साकारायला मिळणं ही माझ्यासाठी भाग्याची बाब आहे असे मी मानतो. एक अभिनेता म्हणून आपल्याला कायम काही तरी आव्हानात्मक भूमिका करायला मिळाव्यात अशी कायम इच्छा असते. माझ्यासाठी




'ड्रीम रोल' असलेली ही भूमिका केवळ आव्हानात्मकच नाही तर एक फार मोठी जबाबदारी आहे याची जाणीव मला आहे. हे शिवधनुष्य पेलण्याचा मी इमानेइतबारे प्रयत्न केलेला आहे. दिवसाअंती आनंद आणि समाधान देणा-या काही भूमिका असतात. या भूमिकेने मला तो आनंद ते समाधान आणि जगण्याकडे बघण्याचा एक नवा दृष्टीकोन दिलाय. अभिजित देशपांडेचं कौशल्यपूर्ण दिग्दर्शन, अतिशय बंदिस्त पटकथा आणि झी स्टुडिओजमुळे लाभलेलं दर्जेदार निर्मितीमूल्य यांनी सज्ज झालेला हर हर महादेव हा चित्रपट मराठीसह इतर भाषांमधूनही प्रदर्शित होणार असल्याने आनंद द्विगुणीत झालेला आहे."

हर हर महादेव चित्रपटाच्या भव्यतेबद्दल बोलताना झी स्टुडिओजचे व्यवसायप्रमुख मंगेश कुलकर्णी म्हणाले की, "यंदाची दिवाळी ही आपल्या प्रेक्षकांसाठी आनंदाची पर्वणी ठरावी अशी मनात इच्छा होती. हर हर महादेव या चित्रपटाच्या माध्यमातून ही पर्वणी आम्ही घेऊन येणार आहोत. छत्रपतींच्या कार्याचा त्यांच्या कर्तृत्वाचा महिमा हा केवळ राज्य आणि देशच नव्हे तर सातासमुद्रापार पोहोचलेला आहे. आभाळाएवढं कर्तृत्व असलेल्या आपल्या छत्रपती शिवरायांचा इतिहास, त्यांची गोष्ट सादर होताना ती त्याच भव्यतेच्या तोलामोलाची असावी असा विचार कायम मनात होता. या चित्रपटाच्या माध्यमातून त्यांचं कार्य अशाच भव्य दिव्य स्वरुपात आपण आणणार आहोत याचा विशेष आनंद आहे. यासाठी चित्रपटाची संपूर्ण टीम अहोरात्र झटत आहे. अनेक हॉलिवुड चित्रपटांवर काम केलेले नामांकित असे चारशेहून अधिक व्हिएफएक्स तंत्रज्ञ या चित्रपटावर काम करत आहेत हे विशेष. चित्रपटाची ही व्याप्ती लक्षात घेऊनच तो पाच भारतीय भाषांमध्ये प्रदर्शित करण्याचा निर्णय झी स्टुडिओजने घेतला आहे."

सुनिल फडतरे यांच्या श्री गणेश मार्केटिंग आणि झी स्टुडिओजची निर्मिती असलेल्या या चित्रपटाचे दिग्दर्शन अभिजित शिरीष देशपांडे यांनी केले आहे.

## पंचविशीतील 'या' अभिनेत्रीला काकू हाक मारताच होतो आनंद?

कलर्स मराठी वाहिनीवरील भाग्य दिले तू मला मालिकेतील राजवर्धन- कावेरी ही जोडी अल्पावधीतच सर्वांची आवडती झाली आहे. या दोघांमध्ये ऑन स्क्रीन इतकीच कमाल केमिस्ट्री



प्रत्यक्षातही पाहायला मिळते. म्हणजेच काय तर जितके खास मित्र राजवर्धन आणि कावेरी आहेत तितकीच मैत्री हे पात्र साकारणारे कलाकार विवेक सांगळे व तन्वी मुंडले यांच्यात खऱ्या आयुष्यातही आहे. आता इतके खास मित्र म्हणजे अर्थात एकमेकांचे सिक्रेट्स यांना माहित असणारच. असंच एक सिक्रेट राजवर्धनने म्हणजेच विवेक सांगळेने लोकसत्ताशी गप्पा मारताना शेअर केलं आहे.

## 'मस्त मौला' दोस्तांचा प्रवास...


'बॉईज ३' च्या चित्रपटासोबतच त्यातील गाणी ही तितकीच लोकप्रिय ठरत आहेत. सोनू निगमच्या जादुई आवाजातल्या 'मनात शिरली' या गाण्यानंतर 'मस्त मौला' हे गाणं प्रेक्षकांच्या भेटीला आलं आहे. सुमंत शिंदे, पार्थ भालेराव, प्रतीक लाड यांच्या त्रिकूटासोबतच्या या प्रवासात विदुला त्यांची साथ देते आहे. 'बॉईज ३' मधील हे गाणं नक्कीच तुमच्या प्लेलिस्ट मध्ये समाविष्ट करण्यासाठी सर्वोत्तम जर्नी साँग आहे. रोड ट्रिप वर निघालेले बॉईज व त्यांच्या या प्रवासात त्यांची साथ देणारी विदुला ह्यांच्या एकत्र प्रवासातील मज्जा, कर्नाटकातील निसर्गरम्य वातावरण या गाण्यात दिसत आहे. 'मस्त मौला' हे गाणं रवींद्र खोमणे व मुन्नावर अली ह्यांनी गायले आहे. या जर्नी साँगला अवधूत गुप्ते यांनी संगीत दिले आहे. गाण्याचे बोल समीर सावंत यांनी लिहिले आहेत. 'बॉईज




३' चित्रपटासोबतच त्यातील गाणी ही तितकीच लोकप्रिय ठरत आहेत. सुप्रीम मोशन पिक्चर्स प्रा. लि प्रोडक्शन अंतर्गत एव्हरेस्ट एंटरटेनमेंटसह अवधूत गुप्ते प्रस्तुत 'बॉईज ३' चित्रपटाचे दिग्दर्शन विशाल सखाराम देवरुखकर यांनी केले असून लालासाहेब शिंदे, राजेंद्र शिंदे, संजय छाब्रिया यांनी निर्मितीची धुरा सांभाळली आहे. येत्या १६ सप्टेंबर रोजी 'बॉईज ३' चित्रपटगृहात प्रदर्शित होत आहे.

## दगडीचाळ थिमवर साकारलेला गणपती देखावा ठरला चर्चेचा विषय....

जयघोष ऐकोनि तुझा देवा जाहली कर्णरंध्रे मुग्ध निगोड कर जोडुनी उभा द्वारी लागली तुझ्या आगमनाची ओढ. सगळीकडे बाप्पाच्या आगमनाची जोरदार तैयारी चालू आहे. गेल्या २ वर्षात लॉकडाऊन मुळे कोणताच सण साजरा करता आला नाही. गेल्या २ वर्षाची पूर्ण कसर यंदा भरून निघणार असा एकंदर चित्र दिसत आहे. गणपती उत्सव म्हटलं कि सजावट, फुलांची आरास, देखावे, रांगोळी हे मनमोहक दृश्य आपल्याला पाहायला मिळते.



देखावे हे जितके सुंदर आपल्याला दिसतात तितकीच मेहनत ते देखावे बनवताना लागते. असाच एक आगळा वेगळा गणपती देखावा अनुष्का पाटील हिने साकारला. आगळा वेगळा म्हणजे नक्की कसा? हा प्रश्न पडलाय ना तुम्हाला. नुकताच प्रदर्शित झालेल्या मंगलमूर्ती फिल्म्स आणि संगीता अहिर निर्मित, कार्यकारी निर्माते रत्नकांत जगताप व चंद्रकांत कणसे दिग्दर्शित सुपरहिट 'दगडीचाळ २' साठी चित्रपटगृहात प्रेक्षकांची रांग लागली असून चित्रपट सुपरहिट ठरत आहे. या चित्रपटाने घराघरात लोकांच्या मनावर छाप पाडली आहे. अंकुश चौधरी, पूजा सावंत, मकरंद देशपांडे यांची या चित्रपटात प्रमुख भूमिका आहे. अनुष्काने यंदा चक्क दगडीचाळीचा देखावा बनवला. या देखाव्याबद्दल अनुष्का खूपच उत्सुक दिसली. अंकुश चौधरीची प्रचंड मोठी फॅन असल्याचा तिने सांगितलं. 'दगडीचाळ २' हा चित्रपट अनुष्काला फार आवडला आणि म्हणूनच तिने ही आगळी वेगळी थिम निवडली असल्याचा सांगितलं.

या फॅनगर्ल अनुष्का बद्दल अंकुश चौधरी म्हणतात, "प्रेक्षकांचं हे प्रेम मी शब्दात व्यक्त करू शकत नाही. अनुष्काने खरंच खूप सुंदर असा दगडीचाळीचा देखावा मांडला. 'दगडीचाळ २' या चित्रपटाला प्रेक्षकांचा इतका मोठ्या प्रमाणात प्रतिसाद पाहून मन आनंदाने भरून आलं आहे. अनुष्काला आणि माझ्या सर्वच रसिक प्रेक्षक वर्गाला खूप खूप धन्यवाद. बाप्पाचा आशीर्वाद आणि तुम्हा सर्व प्रेक्षकांच प्रेम असच पाठीशी राहो अशी आशा करतो."

## शॉर्ट न्यूज »

### अमेरिकन खुली टेनिस स्पर्धा : सेरेनाचा सायोनारा!

न्यूयॉर्क। महाईन्यूज

गेल्या दोन दशकांपासून टेनिस कोर्टवर अनेक विक्रम करणाऱ्या सेरेना विल्यम्सने अमेरिकन खुल्या टेनिस स्पर्धेच्या तिसऱ्या फेरीनंतर टेनिस प्रवासाला पूर्णविराम दिला. स्पर्धेपूर्वीच यंदाची अमेरिकन स्पर्धा अखेरची असल्याचे संकेत सेरेनाने दिले होते. त्यानुसार कारकीर्दीत २३ ग्रँडस्लॅम विजेतेपदे मिळविणाऱ्या सेरेनाने टेनिस विश्वाचा भावपूर्ण निरोप घेतला. ऑस्ट्रेलियाच्या अजला टॉमलजानोविचविरुद्धचा तिसऱ्या फेरीतला सेरेनाचा सामना हा अखेरचा ठरला. तीन तासांहून अधिक चाललेल्या या सामन्यात अजलाने सेरेनाला ७-५, ६-७ (४-७), ६-१ असे पराभूत केले. वयाच्या ४१व्या वर्षीदेखील सेरेनाचा उत्साह, जिद्द कुठेही कमी झालेली नव्हती. सेरेनाने पाच मॅच पॉइंट वाचवले. पण जेव्हा अखेरचा फटका नेटमध्ये अडकला, त्याच क्षणी सेरेनाच्या डोळ्यांच्या कडा पाणावल्या. कोर्ट सोडताना व्यक्त केलेल्या भावना सेरेनाबाबत खूप काही सांगून गेल्या. सेरेना म्हणाली, "माझ्यासाठी २५ वर्षांचा हा सगळा प्रवास अविश्वसनीय होता.

# श्रीलंकेची दमदार कामगिरी!

## अफगाणिस्तानवर मिळवला रोमांचकारी विजय

।न्यूयॉर्क । महाईन्यूज ।

यूएईमध्ये सुरू असलेल्या आशिया चषक स्पर्धेतील अफगाणिस्तान आणि श्रीलंका यांच्यातील लढत चांगलीच अटीतटीची झाली. या सामन्यात दोन्ही संघ तुल्यबळ असल्यामुळे शेवटपर्यंत संघर्ष पाहायला मिळाला. मात्र श्रीलंकेच्या फलंदाजांनी पहिल्यापासूनच आक्रमक पवित्रा घेतल्यामुळे अफगाणिस्तानला पराभव पत्करावा लागला. अफगाणिस्तानने विजयासाठी दिलेल्या १७६ धावांचे लक्ष्य श्रीलंकेने चार गडी राखून गाठले. श्रीलंकेच्या पथुम निसांका (३५), कुसल मेंडिस (३६) यांनी तसेच भानुका राजपक्षे यांनी मोठी फटकेबाजी केल्यामुळे श्रीलंकेला विजयाची गोडी चाखता आली. अफगाणिस्तानने दिलेल्या १७६ धावांचा पाठलाग करताना श्रीलंकेच्या फलंदाजांनी सुरुवातीपासूनच आक्रमक पवित्रा धारण केला. सलामीला आलेल्या पथुम निसांका (३५), कुसल मेंडिस (३६) यांनी विजयासाठी मोठे योगदान दिले. दुसऱ्या विकेटसाठी आलेला चरित असलंका (८) स्वस्तात बाद झाला. त्यानंतर मात्र दानुष्का गुनाथिलका (३३), भानुका राजपक्षे यांनी संघाला विजयापर्यंत नेलं.




**अफगाणिस्तानने विजयासाठी दिलेल्या १७६ धावांचे लक्ष्य श्रीलंकेने चार गडी राखून गाठले. श्रीलंकेच्या पथुम निसांका (३५), कुसल मेंडिस (३६) यांनी तसेच भानुका राजपक्षे यांनी मोठी फटकेबाजी केल्यामुळे श्रीलंकेला विजयाची गोडी चाखता आली. अफगाणिस्तानने दिलेल्या १७६ धावांचा पाठलाग करताना श्रीलंकेच्या फलंदाजांनी सुरुवातीपासूनच आक्रमक पवित्रा धारण केला. सलामीला आलेल्या पथुम निसांका (३५), कुसल मेंडिस (३६) यांनी विजयासाठी मोठे योगदान दिले.**

याआधी सुरुवातीला नाणेफेक जिंकून श्रीलंकेने गोलंदाजी करण्याचा निर्णय घेतला. त्यानंत फलंदाजीसाठी आलेल्या अफगाणिस्तान संघातील रहमानउल्ला गुरबाज, इब्राहीम झरदार या फलंदाजांनी चांगला खेळ केला. गुरबाजने ४५ चेंडुंमध्ये सहा षटकार आणि चार चौकार लगावत ८४ धावा केल्या. तर इब्राहीमने ३८ चेंडूंमध्ये ४० धावा केल्या. हे दोन फलंदाज वगळता अफगाणिस्तानचा कोणताही फलंदाज चांगली खेळी करू शकला नाही. सलामीला आलेला. हजरतुल्ला झाझाई (१३) स्वास्तात बाद झाला. तर तिसऱ्या विकेटसाठी आलेल्या नजीबउल्लाह झदरान याने १७ धावा केल्या. नाबी (१) खास कामगिरी करू शकला नाही. तर राशीद खान (९) नाबाद राहिला.

# ऐतिहासिक आशियाई विजयाचा आज हीरक महोत्सव



। मुंबई। महाईन्यूज ।

भारतीय फुटबॉलने गेल्या काही वर्षांत आपला स्तर उंचावला असला तरीही त्यांना अजूनही ऑलिम्पिकपर्यंत मजल मारता आली नाही. भारतीय फुटबॉलचा १९५१ ते १९६२ हा काळ सुवर्णकाळ संबोधला जातो. याच कालखंडात ४ सप्टेंबर १९६२ हा दिवस भारताच्या फुटबॉल इतिहासातील सुवर्णाक्षरांनी लिहिलेला दिवस आहे. याच दिवशी भारताने आशियाई क्रीडा स्पर्धेत सुवर्णपदक जिंकले होते. आज या घटनेला ६० वर्षे पूर्ण होत आहेत.

सय्यद अब्दुल रहीम यांच्या मार्गदर्शनाखाली भारताने जकार्ता येथे झालेल्या या स्पर्धेत सहभाग नोंदवला. स्पर्धेची सुरुवात भारतासाठी चांगली झाली नाही. भारताला साखळी सामन्यात दक्षिण कोरियाने २-० असे पराभूत केले. यानंतर भारताने थायलंडला ४-१ असे नमवले. या विजयात पी.के.बॅनर्जी यांनी दोन गोल करीत निर्णायक भूमिका पार पाडली, तर चुन्नी गोस्वामी आणि तुलसीदास बलराम यांनी प्रत्येकी एक गोल केला. पुढील लढतीत भारताने जपानचा २-० असा पराभव केला. यामध्येही बॅनर्जी आणि बलराम यांनी गोल केले. या कामगिरीनंतर भारताने उपांत्य फेरीतील स्थान निश्चित केले. उपांत्य सामन्यात भारताने दक्षिण व्हिएतनामवर ३-२ असा विजय साकारत अंतिम फेरीत स्थान मिळवले. या विजयातही गोस्वामी (दोन गोल) आणि जर्नेल सिंग (एक गोल) यांनी योगदान दिले. अंतिम सामन्यात भारतासमोर मजबूत समजल्या जाणाऱ्या दक्षिण कोरियाचे आव्हान होते. १९५८ च्या आशियाई क्रीडा स्पर्धेच्या उपांत्य फेरीत भारताने दक्षिण कोरियाकडून १-३ अशी हार पत्करली. त्यामुळे भारताला या पराभवाचा वचपा काढण्याची संधी होती. या सामन्यात भारतासमोर दुखापतीचेही आव्हान होते, मात्र त्यावरही आपल्या खेळाडूंनी मात केली.

महाईन्यूज
जाहिरात आणि बातम्यांसाठी संपर्क
96577 67000

महाईन्यूज नोंद असू द्या..
महाईन्यूजची डिजीटल आवृत्ती छपाईसाठी नाही